# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : scholarshiphd@gmail.com

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स नं.०२०/२६११११५३


क्र.: उशिसं-२०१६/ई.बी.सी.सवलत/२०१६ /१३७०६ . दि. 21 NOV 2016

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

**विषयः ई.बी.सी. सवलत योजनेबाबत सन २०१६-१७..**

संदर्भः शासन निर्णय क्र.: टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४ दि. १३.१०.२०१६

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ पत्र क्र. १ अन्वये सन २०१६-१७ पासून ई.बी.सी. सवलत योजनेबाबतची कार्यवाही ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने या संचालनालयाकडून हे संकेतस्थळ कार्यान्वित करण्यात आले आहे. तसेच आपल्या विभागीय कार्यकक्षेतील शासकीय/अशासकीय, अनुदानित/विनाअनुदानित (टप्प्यांवरील) महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांनी ऑनलाईन भरुन घ्यावेत व सदर प्रक्रिया योग्य प्रकारे राबविली जाईल याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तथापी आज दि. १९.११.२०१६ पर्यंत सर्व विभागीय सहसंचालक कार्यालयांच्या कार्यकक्षेतील महाविद्यालयांतील केवळ १६००० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज पूर्णपणे भरले असल्याचे निदर्शनास आले आहे.

मागील वर्षाच्या तुलनेत या वर्षी ई.बी.सी. सवलतीसाठी अर्ज करणा-या विद्यार्थ्यांची संख्या अत्यल्प असल्याचे ऑनलाईन अर्जावरुन स्पष्ट होते.

या संचालनालयाचे पत्र क्र.१२७३३ दिनांक ९.११.२०१६ अन्वये सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या कार्यशाळा घेऊन ई.बी.सी. सवलत योजनेबाबत ऑनलाईन प्रक्रिया राबविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापी अद्याप सर्व महाविद्यालयांना व सर्व विद्यार्थ्यांना सदर योजनेचे अर्ज ऑनलाईन भरण्याच्या सूचना पोहोचल्या असल्याचे दिसून येत नाही.

ज्या विभागातील ई.बी.सी. तपासणीबाबतचे कॅंप पूर्वी झालेले असतील त्या महाविद्यालयातील ई.बी.सी. सवलत मंजूर झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून दिनांक २५.११.२०१६ पर्यंत ऑनलाईन अर्ज भरुन घेणे अनिवार्य आहे. याबाबत आपण आपल्या स्तरावरुन संबंधित महाविद्यालयांना कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास सादर करावा. त्याचप्रमाणे ज्या विभागांनी ऑनलाईन प्रक्रिया राबविण्याबाबत सूचना देण्यासाठी कार्यशाळा घेतलेल्या आहेत त्यांनी त्याबाबतचा अहवाल देखिल सादर करावा. ज्या विभागांनी अद्यापपर्यंत कार्यशाळा घेतलेल्या नाहीत त्यांनी कार्यशाळा घेण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

त्याच प्रमाणे आपल्या विभागांतर्गत असलेल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक उपलब्ध नसल्यामुळे विभागीय कार्यालयांनीच त्यांच्या विभागातील महाविद्यालयांचे युजर आयडी व पासवर्ड पाठवावयाचे आहेत, ते ebc.dhemaharashtra.in वरुन सहसंचालक यांच्या स्तरावरुन लॉगीन करुन मिळतील त्याच प्रमाणे काही महाविद्यालय

अथवा महाविद्यालयातील ई.बी.सी.योजनेअंतर्गत येणारा एखादा अभ्यासक्रम दिसत नसल्यास सदर अभ्यासक्रम व महाविद्यालय सहसंचालक कार्यालयाच्या स्तरावरुन यादीमध्ये समाविष्ठ करण्याचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे तथापि असे महाविद्यालय अथवा अभ्यासक्रम समाविष्ठ करतांना त्यासाठी ई.बी.सी.योजना लागू होते याची खातरजमा करण्यात यावी संबंधित महाविद्यालयाचे नाव पुर्वीच्या यादीत आले नसल्याची खात्री करुनच नव्याने समाविष्ट करावे. तसेच महाविद्यालयांना त्यांच्या लॉगीन वर manual for application approval दिसेल त्याप्रमाणे त्यांना कार्यवाहीचे आदेश देण्यात यावेत.

(डॉ.वि.आर.मोरे)
सहसंचालक
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत :

सर्व वरिष्ठ लेखा परिक्षक ,उच्च शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य, यांना माहितीस्तव.